
NEHRU BAL PUSTAKALAYA

# रोहंत आणि नंद्रीय

कृष्ण चैतन्य


अनुवाद : शोभा वऱ्हाडपांडे





रु. 15.00 ISBN 81-237-0113-6

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया



ISBN 81-237-0113-6

पहिली आवृत्ती 1973 *(शके 1894)*
तिसरी आवृत्ती 1990 *(शके 1912)*
चौथी आवृत्ती 1991 *(शके 1913)*
पाचवी आवृत्ती 1992 *(शके 1914)*
सहावी आवृत्ती 2002 *(शके 1923)*

© कृष्ण चैतन्य, 1971

मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1973

Rohanta and Nandriya *(Marathi)*

**रु. 15.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.

भगवान बुद्धाचे करोडो भक्त जगात आहेत. मानव जातीच्या सर्वांत दयाळू व बुद्धिवान धर्मोपदेशकांपैकी ते एक होते, हे आपणास माहितच आहे.

वस्तुतः 'बुद्ध' हे नाव नाही. जिला बोध किंवा ज्ञान प्राप्त झाले आहे, जिला जीवनाचा खरा अर्थ समजला आहे, शांती व सुख प्राप्त करून घेण्यासाठी मानवाने कसे जगले पाहिजे यावर जिने सखोल विचार केला आहे अशी व्यक्ती म्हणजे बुद्ध. हा या शब्दाचा अर्थ आहे. बुद्धाचे खरे नाव होते सिद्धार्थ. ते एक राजकुमार होते. अडीच हजार वर्षांपूर्वी ते या देशात राहात होते.

एका अंधाऱ्या रात्री त्यांनी आपल्या राजमहालाचा त्याग केला. त्यानंतर वर्षांनुवर्षे ते देशात भ्रमण करीत राहिले. आपले घर, आपले आई-वडील, आपली पत्नी किंवा



पुत्र यावर त्यांचे प्रेम नव्हते म्हणून त्यांनी घर सोडले नव्हते. त्यांनी सर्वत्र इतके दुःख, इतके कष्ट पाहिले की ते दूर करण्याचा उपाय शोधल्याशिवाय त्यांना चैन पडले नसते म्हणून त्यांनी घर सोडले होते.

सूर्योदय होताच फुले फुलतात. त्यांच्यावर पडलेले दवबिंदू सूर्याच्या प्रकाशात हिरकण्यांसारखे चमकू लागतात. परंतु सूर्यास्त झाल्याबरोबर फुले कोमेजून जातात. वसंत ऋतूत झाडे फुलांनी बहरून येतात. परंतु त्यानंतर येते पानझड व गरमी. वृक्षावरील सर्व पाने, फुले गळून पडतात. बालके मोठी होतात, किशोर होतात, तरुण होतात. त्यांच्याकरिता जीवन हे आनंदाने परिपूर्ण असलेले एक क्रीडांगण बनते. परंतु म्हातारपणापासून कोणी वाचू शकत नाही. आणि एके दिवशी तर मानवाचाच काय पण प्रत्येक जीवजंतूचा विनाश होतो.

कदाचित हाच जगाचा नियम असावा. यामुळे दुःखी होऊन काय फायदा! जिवंत आहोत तोपर्यंत प्रसन्न व संतुष्ट राहून एकमेकांचे भले करण्याचा प्रयत्न नाही का आपण करू शकणार? पण दिसते तर असेच की मानव असे करू शकत नाही. जगात इतके जास्त दुःख व असंतोष असण्याचे सर्वांत मोठे कारण हेच आहे की, लोक विनाकारण किंवा निरर्थक परस्परांचा द्वेष करतात, आपापसात भांडत बसतात. लोक जर कमी स्वार्थी असते तर एकमेकांबरोबर अधिक चांगले राहू शकले असते. त्यामुळे जग अधिक आनंदमय झाले असते.

ज्यामुळे मानव निःस्वार्थी होऊन चांगला होईल असा उपाय शोधण्यासाठी राज-





कुमार बेचैन झाले होते. सुख, ऐश्वर्याचा उपभोग घेत महालात राहून आपली उद्दिष्टपूर्ती कधीच होणार नाही हे ते जाणून होते.

रात्री घर सोडताना फुलांच्या शय्येवर झोपलेल्या आपल्या पत्नीकडे व पुत्राकडे त्यांनी वारंवार वळून पाहिले. आपल्या लहानशा पुत्राला सोडून जाताना त्यांचा ऊर दुभंगत होता. एकदा तर त्यांना असे वाटले की, त्याला बरोबर घेतल्याशिवाय आपले पाय पुढे पडणारच नाहीत. परंतु गाढ झोपेत देखील त्याची माता त्याला कुशीत घेऊन आपल्या बाहुपाशाचे संरक्षण त्याला देत होती. राजकुमारांना वाटले, 'युवराज्ञीचा हात दूर केला तर ती नक्कीच जागी होईल. मग मी कधीच येथून जाऊ शकणार नाही. परिभ्रमणानंतर मानवी दुःख दूर करण्याचा उपाय शोधल्यावर मी पुन्हा आपल्या पुत्राला पाहायला परत येईन.'

अनेक वर्षे यात्रा व चिंतन केल्यानंतर राजकुमारांना उमगून आले की त्यांनी घर सोडले त्याच दिवशी जीवन सुखी व शांतिपूर्ण कसे करावे या समस्येचे उत्तर त्यांना मिळाले होते. परंतु त्यावेळी त्याचा अर्थ त्यांना समजला नव्हता. तो आता त्यांना उमगला होता. ते म्हणाले, 'आई ज्याप्रमाणे मुलाची रक्षा करते त्याचप्रमाणे प्रत्येक



मानव-प्राण्याचे रक्षण केले पाहिजे. जर प्रत्येक मनुष्य आई बालकाची काळजी घेते त्याप्रमाणे इतरांची काळजी वाहील तर ह्या प्रसन्न बालकाप्रमाणे मोठ्यांच्याही जगात आनंद नांदेल. प्राणिमात्राविषयी बुद्धाच्या मनात करुणा व प्रेम होते. त्यांच्या मृत्यूनंतरदेखील लोक त्यांची करुणा विसरले नाही.

शुभ कर्म करणारे लोक मृत्यूनंतर स्वर्गात जातात व तेथे नेहमी आनंदात राहातात असा लोकविश्वास असल्याचे आपल्याला माहीत आहेच. या संदर्भात बुद्धाविषयी एक कथा सर्वत्र पसरली. मनुष्य व पशुपक्षी यांच्या पिढ्यामागून पिढया जन्माला येतात. त्यांना आपल्या दुःखीकष्टी जीवनात बुद्धाची जरुरी भासते म्हणून स्वर्गसुख भोगण्यास त्याने नकार दिला. म्हणून असे म्हणतात की वेगवेगळी रूपे धारण करून त्यांनी पृथ्वीवर वारंवार अवतार घेतले. सिद्धार्थाच्या रूपाने अवतार घेण्यापूर्वी त्यांनी अनेक जन्म घेतले होते. वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या रूपाने त्यांनी जे जन्म घेतले त्याविषयी अनेक कथा प्रसृत झाल्या. अशा कथेला 'जातक' (जन्म) म्हणत, कारण प्रत्येक कथेत बुद्धाच्या एखाद्या जन्माविषयी माहिती सांगितलेली असे. काही काळानंतर या सर्व कथा पाली भाषेत लिहिल्या गेल्या. पाली ही प्राचीनकाळी मगधात बोलली जाणारी भाषा होती. प्राचीन बौद्ध धार्मिक ग्रंथांची भाषा हीच होती.

जातकात पाचशेपेक्षा जास्त कथा आहेत. या कथा म्हणजे एक अमूल्य खजिना आहे. त्या अत्यंत सुंदर आहेत. पालीतून संस्कृतमध्ये त्यांचा अनुवाद व विस्तार करण्यात आला. प्राचीन मूर्तिकारांनी सांची, भरहुत आणि अमरावतीसारख्या बौद्ध धर्माच्या केंद्रस्थानी या कथा मूर्ती व उत्कीर्ण भित्तीचित्रांद्वारा साकार केल्या. चित्रकारांनीसुद्धा रंग व रेखांच्या साह्याने त्यांना अंकित केले. जातकाच्या जवळ-जवळ सर्व कथा अजिंठ्याच्या गुफांमध्ये चित्रित केल्या आहेत.

कृष्ण मृग रोहंत व बंदर नंद्रीय यांच्या दोन कथा मी येथे सांगणार आहे. यांची करुणा व आत्मत्याग यांनी परिपूर्ण असलेली कथा ऐकल्यावर हे दोघे जगाला सुखी करण्यासाठी वारंवार जन्म घेणारे करुणामय बुद्धच होते याविषयी आपल्या मनात काही संशय राहाणार नाही.

## कृष्णमृग रोहंत

फार फार दिवसांपूर्वी उत्तर प्रदेशातील एका जंगलाशेजारच्या मैदानात काळ्या रंगाचे हरिण जन्माला आले. आई-वडिलांनी त्याचे नाव ठेवले रोहंत.

तुम्ही कधी काळे हरिण पाहिले आहे काय? मृगजातीत ते सर्वांत सुंदर असते. भारताच्या जंगलातच हे हरिण आढळतात. नराची पाठ काळीभोर असते. पोटांचा खालचा भाग पांढरा असतो. त्याला दोन सुंदर कुरळी शिंगे असतात. त्यामुळे ते फार सुंदर दिसते. हरिणी लहानखुऱ्या व बिनाशिंगाच्या असतात, परंतु त्या दिसतात तितक्याच सुंदर. त्यांचा रंग पिवळ्या उंटासारखा असतो. सुरवातीला रोहंताचा रंग देखील तसाच होता. परंतु तो तीन वर्षाचा होताच त्याचा रंग काळाभोर होऊ लागला. त्याचे आई-वडील यामुळे फार खुष झाले, कारण रंग बदलला याचाच अर्थ त्यांचा मुलगा आता वयात येत होता, तो आता स्वतःचे रक्षण करू शकत होता.

रोहंत आणि त्याचे आई-वडील शंभर हरणे असलेल्या एका कळपात राहात होते. दर वर्षी कळपातील काही हरणे मृत्युमुखी पडत तर काही नवे जन्माला येत



त्यामुळे कळपातील हरिणांची संख्या नेहमी शंभरच राही. हरिणी एका वेळी एक किंवा दोन बछड्यांना जन्म देई. ती त्यांना उंच वाढलेल्या गवतात दडवून ठेवी. बछडी लवकरच बलिष्ठ होत व कळपात येऊन मिसळत.

रोहंत खूप हुशार होता. आपल्या कळपाचे रीतीरिवाज तो चटकन शिकला. हरणांचा कळप गवतात चरे. जंगलाच्या सीमेवर शेती असली तर त्यात शिरून तो पीक खाऊन टाकी. खुल्या जंगलातील विस्तीर्ण गवती भागात ते जात आणि काही धोका आढळल्यास उंच वाढलेल्या गवतात ते दडून बसत. दोन प्रहरपर्यंत चरत राहात, नंतर तिसऱ्या प्रहरी ते झऱ्यावर येत. दिवसा उष्मा जास्त असला की ते लवंडून आराम करीत. त्यांची ऐकण्याची व हुंगण्याची शक्ती साधारणच होती. तीक्ष्ण दृष्टी आणि चपळ गती हेच त्यांचे रक्षणाचे साधन होते. सारख्या वेगाने दूरपर्यंत धावणाऱ्या चपळ जनावरात काळे हरिण हे एक आहे. ते दर ताशी चाळीस मैल या वेगाने धावू शकते. पहिल्यांदा उंच उड्या मारते, हवेत सरळ कित्येक फूट ते वर जाते, मग लांब उड्या घेत धावू लागते. धावत्या हरणांचा कळप प्रेक्षणीय असतो. काही जोर न लावता उडत असल्यासारखी, ती समोरून निघून जातात. हे एक अद्भुत दृश्य असते.





रोहंत फार लहान असतांना एक घटना घडली. त्यावरून त्याची तीव्र बुद्धिमत्ता दिसून येते. वनात कधी कधी जंगली आंब्याची झाडे उगवतात. पक्ष्यांनी कुरतडलेले आंबे झाडाखाली पडलेले असतात. फळे खालच्या डहाळ्यांवर लागलेली असली तर हरिण आपले दोन्ही पाय उंचावून तिथपर्यंत तोंड लावतात. या जंगलात नेहमी एक शिकारी येई. एखाद्या झाडाखाली हरणांच्या खुरांची चिन्हे दिसली की तो उंचावर एक मचाण बांधी. ते कुशलतेनें पानाने झाकून टाकी. मग तिथे लपून योग्य संधीची वाट पाहात राही. एखादे हरिण तेथे आले की तो भाला फेकून त्याला ठार मारी. जनावरांचे मांस व कातडी विकून तो आपला चरितार्थ चालवी.





एके दिवशी रोहंताला आंब्याचे एक झाड दिसले. त्याच्या फांद्या खाली झुकलेल्या होत्या. त्यांना पिकलेले आंबे लटकले होते. पुष्कळशी चांगली चांगली फळे जमिनीवर सुद्धा पडली होती. अतिशय निरोगी असल्यामुळे रोहंताची क्षुधाही चांगली होती. त्याने पोटभर फळे खाल्ली. परंतु अजूनही बरेच आंबे पडले होते. उद्या परत येऊन ही फळे खाण्याचा त्याने विचार केला.

रोहंत निघून गेल्यावर शिकारी तेथे आला. त्याला हरणाच्या पायाच्या खुणा दिसल्या. त्याने झटपट एक मचाण बांधले. नंतर तो घरी निघून गेला. दुसऱ्या दिवशी पहाटेच न्याहारी करून तो जंगलाकडे निघला. झाडावर बांधलेल्या मचाणावर लपून बसला. जवळच भाला तयार ठेवला होता. थोडा वेळ कोणीच आले नाही. अचानक एक छोटे हरिण झाडाकडे येताना त्याला दिसले. ते पाहून तो उत्तेजित झाला. ते हरिण रोहंतच होतं.

पण शिकारी जसा हरणाच्या पाउलखुणा ओळखत होता तसे रोहंतालासुद्धा शिकाऱ्याच्या पाउलखुणा ओळखता येत होत्या. तसा शिकारी फार सावध होता पण एक दोन खुणा राहून गेल्या होत्याच. वर पहाताच रोहंताला वाटले की झाडाच्या





पानांचीही कोणी चाळवाचाळव केली आहे. त्याला धोक्याची शंका आली. झाडापासून काही अंतरावरच तो थांबला.

उत्सुक शिकारी अत्यंत अधीर होऊन हरिण जवळ येण्याची वाट पाहात होता. रोहंत हालेनासा पाहून त्याने एक पिकलेला आंबा तोडून रोहंताच्या दिशेने जाईल अशा बेताने जमिनीवर फेकला. हा आंबा पहाताच अधिक आंबे मिळतील. या लालसेने तो जवळ येईल अशी आशा शिकाऱ्याला वाटत होती.

आंबा गडगडत रोहंताकडे येऊ लागताच काहीतरी गडबडघोटाळा असल्याची शंका त्याला आली. त्याने झाडांच्या पानांकडे, विशेषतः जिथे त्यांची रचना काही दिवसांपासून बदलल्यासारखी वाटत होते तिकडे अत्यंत लक्षपूर्वक पाहिले. पहिले तर त्याला धोक्याचे काही चिन्ह दिसले नाही. पण त्याच्या नशिबाने वाऱ्याच्या मंद झुळकांनी झाडाची पाने हालू लागली. थोडा वेळच वारा चालला पण तेवढेच पुरेसे होते. रोहंताला शिकारी दिसून आला.

शत्रूला आपण पाहिले आहे हे न दाखवता तो मोठ्याने म्हणाला, 'माझ्या प्रिय झाडा, आतापर्यंत तुला आपली फळे सरळ जमिनीवर पाडण्याची सवय होती, पण आज तर तू आपली फळे दगडांसारखी लोकांवर फेकीत आहेस. प्रिय मित्रा, यावरून असे दिसते की, मी तुला आवडेनासा झालो आहे. म्हणून मी येथून निघून जात आहे. यापेक्षा जास्त प्रेमाने स्वागत करणाऱ्या झाडाचा शोध मी करीन. अच्छा तर, राम राम! मी चाललो'.



हे वात्रट हरिण आपल्याला चिडवीत आहे हे शिकाऱ्याला उमगले. रागावून आपला भाला त्याने त्याच्यावर फेकला. जेथे भाला पडला त्यापासून थोड्या अंतरावरच रोहंत उभा होता. भाला जमिनीवरच पडला. शिकाऱ्याला आणखी चिडविण्याकरिता त्या शूर हरणाने दाताने भाला उचलून पलायन केले.

परंतु दुसऱ्यांदा रोहंताची सुटका इतक्या सहजासहजी झाली नाही. एकदा जंगलात फिरत असताना शिकाऱ्याने लावलेल्या जाळ्यात तो सापडला. क्षणभर तो घाबरून गेला. मग प्रयत्नपूर्वक मनातील भय दूर सारून सुटकेचा उपाय शोधू लागला. काही वेळानंतर त्याला एक उपाय सुचला. जाळ्यातून सुटण्यासाठी त्याने हातपाय हालवले नाही. कारण हातपाय हालविले तर आपण जाळ्यात अधिकच गुंतले जाऊन स्वतःला सोडवू शकणार नाही हे त्याला माहीत होते. एका कुशीवर होऊन पाय ताणून तो पडला. आजूबाजूची जमीन पंजांनी उकरून चारीकडे गवत व माती विखरून दिली. डोळे फिरवून डोके एका बाजूला झुकविले आणि जीभ बाहेर काढली. लाळेने त्याचे सारे शरीर ओले व चिकट बनले. माशांच्या झुंडी त्याच्याभोवती फिरू लागल्या. काही कावळे त्याच्या मृतवत शरीरावर येऊन बसले.

दीर्घ प्रतीक्षेनंतर, दुपारी बऱ्याच उशिरा, काय झाले ते पाहायला पारधी आला. दुरूनच हरिण जाळ्यात फसलेले पाहून तो फार खूष झाला. जवळ जाऊन पाहातो तो सर्व घोटाळा झालेला. हरणाच्या ताठरलेल्या शरीरावर कावळे बसले होते. सर्वत्र माशा भणभणत होत्या. सर्व जमीन उकरली होती. मृत्यूपूर्वी सुटकेसाठी हरणाने खूप धडपड केल्यासारखे वाटत होते.





पारध्याने हरणाचे शरीर थोपटले. जिवंतपणाचे कोणतेच चिन्ह दिसत नव्हते. माझं नशीबच वाईट' तो पुटपुटला "आज सकाळीच सापडलेले दिसते. पळण्याचा प्रयत्न करताना जाळे गळ्याभोवती आवळून मेले असावे बेटे! आताच हे सडायला लागले. घरी जाईपर्यंत याचे मास खाण्यालायक राहाणार नाही. काही मास येथेच खाऊन काही घरी घेऊन जावे झालं!" त्याने जाळे काढले. हरिण तेथेच पडले राहू दिले. आगटी पेटविण्यासाठी तो लाकडे व पाने गोळा करू लागला. पारधी बराच दूर गेल्यावर रोहंत उभा राहिला. आपली मान सरळ करून शरीराचे ताठरलेपण त्याने दूर केले व तीरासारखा पळत आपल्या कळपात जाऊन मिळाला.

रोहंत मोठा होत गेला तसा अशा घटनांवरून त्याला समजून चुकले की जीवन फार सुंदर आहे, पण संकटांनी भरलेले आहे. या संकटांना एकट्याने तोंड देणे शक्य नाही. संकटसमयी जे आपणास मदत करू शकतील व आपण ज्यांना मदत करू शकू अशा मित्रांची जीवनात जरुरी असते हे त्याला कळून आले.

जंगलालगतच्या गवताळ देशात, रोहंत राहात होता तेथे, एका सुतारपक्ष्याने एका उंच झाडाच्या शेंड्यावर आपले घरटे बांधले होते. सुतारपक्षी ज्या झाडावर राहात होता त्यालगत एक छोटेसे तळे होते. त्यात एक कासव राहात असे. त्यापासून






थोडया अंतरावरच एक मोठा तलाव होता. संध्याकाळी हरणांचा कळप तेथे पाणी प्यायला यायचा. परंतु रोहंताला जंगलातील छोटे तळेच आवडायचे. कारण तेथे येऊन तो कासवाशी गप्पा करायचा. सुतारपक्षीही त्यांच्याजवळ येऊन बसायचा. तिघांची खूप मैत्री झाली होती.

एके दिवशी त्या रस्त्याने जाताना पारध्याला हरणाच्या पाउलखुणा दिसल्या काही आठवडयांपूर्वी तेथून तो गेला होता पण त्याला त्यावेळी या खुणा दिसल्या नव्हत्या. यावरून तेथे पाणी पिण्यासाठी जंगली जनावर येत होते हे उघडच होते त्याला कळून चुकले की कोठले तरी हरिण येथे नेमके पाणी प्यायला येते. चामडयाच्या वादीचा फास घेऊन तो तेथे गेला. तळ्याच्या तळाशी कासव विश्रांती घेत होते. त्यामुळे त्याला शिकारी फास लावताना दिसला नाही.

बरीच संध्याकाळ झाल्यावर रोहंत तेथे आला व फासात अडकला. त्याचा आक्रोश ऐकून त्याचे दोन्ही मित्र तेथे आले. कासव वर तळ्याच्या काठाशी आले आणि





सुतारपक्षी उडत खाली येऊन एका दगडावर बसला. सुतारपक्षी कासवाला म्हणाला, 'मित्रा, तुझे दात मजबूत आहेत तेव्हा हा फास तू कापून टाक. चामड्याची वादी फार मजबूत असते. ती तोडायला पुष्कळ वेळ लागेल, कदाचित संपूर्ण दिवस लागेल. तुझे काम संपेपर्यंत शिकाऱ्याला येथे येऊ न देण्यासाठी काय करायचे ते मी पाहातो'

जंगलाच्या कडेला असलेल्या खुल्या जागेत शिकाऱ्याची झोपडी होती. सुतारपक्षी उडत तेथे गेला व झोपडीच्या आंगणासमोरील एका झाडावर रात्रभर वाट पाहात बसला. पाहाट होताच शिकारी सुरा घेऊन निघाला. हे पाहाताच सुतारपक्षी त्याच्या चेहऱ्यावर झेपावला व ओरडत त्याच्या गालावर पंखाने प्रहार करू लागला. चेहऱ्यावर विष्ठा करून तो घाण केला. शिकारी मोठा अंधविश्वासी होता. त्याचा शकुनापशकुनावर फार विश्वास होता. घरातून कामासाठी बाहेर पडताच चेहऱ्यावर पक्ष्याची विष्ठा पडणे हा अपशकुन आहे असे त्याला वाटले. सकाळी बाहेर न जाण्याचा निर्णय त्याने घेतला.

पुन्हा दुपारी बाहेर पडायचे त्याने ठरविले. पक्षी आहे की गेला हे पाहाण्यासाठी त्याने खिडकीतून वाकून पाहिले. परंतु सुतारपक्षी तेथेच बसला होता. खिडकीतून डोकावणाऱ्या शिकाऱ्यास त्याने पाहिले. या अपशकुनी पक्ष्यापासून वाचण्यासाठी मागील दाराने जाण्याचा विचार त्याने केला. पण सुतारपक्षी अत्यंत चतुर होता. शिकाऱ्याचा डाव त्याने ओळखला. शिकारी मागील दाराने बाहेर पडला तेव्हा सुतारपक्षी तयारच होता. पुन्हा त्यावर झेपावून त्याच्या गालावर पंखाने प्रहार केला व शरीरावर विष्ठा टाकली. आता शिकारी खूप संतापला. पक्ष्याचा गळा दाबून त्याचा



काटा कायमचा दूर करण्यासाठी तो त्याला पकडण्याचा प्रयत्न करू लागला. शिकाऱ्याशी झुंज घेणे धोक्याचे आहे हे पक्ष्याने ओळखले. तो उडून एका झाडावर जाऊन बसला. शिकारी आता काय करतो हे तो तेथून पाहू लागला. शिकाऱ्याचे डोके आता फिरले होते. शकुन होवो की अपशकुन जंगलातील तळ्याकडे जाण्याचा निश्चय त्याने केला. रागाने लांब टांगा टाकीत जाणाऱ्या शिकाऱ्याला पाहून येथे थांबण्यात काही फायदा नाही हे पक्ष्याने ओळखले. मित्रांना सावध करण्यासाठी शक्यतो वेगाने तो तलावाकडे निघाला. तेवढया वेळात कासवाने चामड्याची वादी जवळजवळ कापून काढली होती. फक्त एक भाग काय तो राहिला होता. आपले दात आता पडतील की काय असे त्याला वाटत होते. त्याचे तोंड रक्ताने भरले होते. सुतारपक्ष्याने शिकारी येत असल्याची बातमी सांगितली. कासवाचे दात व जबडे दुखत होते तरीही सारा जोर लावून तो वादी कापू लागला. शिकाऱ्याला सुरी घेऊन धावत येताना पाहाताच रोहंत उठून तयार झाला. शिकारी दहा पावलावर असताना वादी तुटली आणि हरिण वायुवेगाने जंगलात पळाला. सुतारपक्षी उडून वृक्षाच्या सर्वात उंच फांदीवर जाऊन बसला. परंतु रात्रंदिवस काम करून कमजोर झालेले बिचारे कासव बेशुद्ध होऊन तेथेच पडले.



शिकारी खूप रागात होता. त्याने कासवाला उचलून झोळीत टाकले. व ती झाडाच्या खालच्या फांदीला बांधून टाकली.

पळणाऱ्या रोहंताने मागे वळून हे पाहिले. पारध्याचे कृत्य पाहून रोहंत एकदम थांबला. तो पडता पडता वाचला. त्याला सोडून कसे जायचे बरे? त्याने तात्वडतोब एक युक्ती शोधून काढली. अडखळून पडल्याचे नाटक त्याने केले. नंतर खूप वेदना







होत आहेत अशा आविर्भावात पुन्हा खाली पडला. त्याप्रमाणे तो वारंवार उठायचा व पडायचा. हे पाहून पारध्याला वाटले हरिण फार थकला आहे. व तो जोराने धावू शकणार नाही. आता सुरा उगारून तो त्याला पकडायला निघाला. पारध्याच्या पकडीबाहेर राहून उठण्यापडण्याचे सोंग करीत हरिण त्याला आपल्यामागे जंगलात घेऊन आला. पुरेसे दूर येताच पारध्याला गुंगारा देऊन वायुवेगाने तो परत फिरला. कासवाला बांधलेली झोळी शिंगानी उचलून त्याने जमिनीवर आदळली. ती फाडून त्याने कासवास मुक्त केले. कासवाने रोहंताला धन्यावाद दिले व सरपटत तलावात जाऊन तो अदृश्य झाला.



या प्रकारे काळ गेला. रोहंत मोठा होऊन दलातील मोठ्या लोकांमध्ये त्याची गणना होऊ लागली. दलाचा वृद्ध नेता मेला तेव्हा सर्वांनी रोहंताला नवा नेता म्हणून निवडले.

रोहंतावर फार मोठे संकट येणार आहे याची शंकाही त्यावेळी कोणाला आली नव्हती.

बनारसचा वृद्ध राजा स्वर्गवासी झाला. त्याचा मुलगा गादीवर बसला. नव्या तरुण राजाला शिकारीचा फार नाद होता. ज्या जंगलात व मैदनात हरणांचे कळप होते. ते याच्या राज्यात होते. नव्या राजाच्या शिकारप्रेमामुळे जनावरांना तर धोका निर्माण झालाच पण प्रजाही त्रस्त झाली. शहरात व खेड्यात राहाणाऱ्या सर्वांना आपल्याबरोबर शिकारीला चलण्याचा हुकूम तो देई. शिकारस्थळाच्या चारी बाजूंनी ते घेरा घालीत व झुडपे पिटून हरणांना बाहेर हुसकावीत, मग राजा बाणांनी त्यांची शिकार करी. तरुण राजा जवळ जवळ रोज शिकारीला जाई. त्यामुळे लोकांना आपला कामधंदा करणे कठीण होऊन बसले.

ही समस्या सोडविण्यासाठी राज्यातील काही वयोवृद्धांनी सभा घेतली. राजाचा महाल लांबरुंद मैदानात होता. एका वृद्धाने सुचविले, 'या मैदानाभोवती कुंपण घालून आत चांगले गवत लावावे. मग हरिणांचे मोठमोठे कळप त्यात राहू शकतील. त्यांना हवे तितके चारापाणी येथे मिळेल. मग हरणांना येथे पकडून आणू. हरिण महालाजवळच असल्याने राजा हवी तेव्हा त्यांची शिकार करू शकेल मग आम्हाला त्रास द्यायची गरज पडणार नाही."

सर्वांना हा विचार पसंत पडला. राजाकडे जाऊन हा प्रस्ताव समोर मांडला. राजा आनंदाने कबूल झाला. आता आपला त्रास वाचेल या विचाराने लोकांनी उत्साहाने गवत लावले, तलाव खोदले. त्यांच्या मेहनतीमुळे मैदानाचे रूपांतर सुंदर बगीच्यात झाले. चारीकडे कुंपण लावून झाल्यावर सर्व शहर जंगलात लोटले. जंगल घेऊन, झाडाझुडपांना पिटून हरणांना त्यांच्या गुफांतून बाहेर काढण्यात आले. मग ढोल बडवून व ओरडून त्यांनी इतका आवाज केला की हरिण घाबरून गेले. त्यांना हाकून बागेत आणले गेले. जेव्हा सर्व हरिण आत आले तेव्हा नगरवासियांनी फाटक बंद





करून घेतले. राजाला त्यांनी जाऊन सांगितले की आपण आता हवी तेव्हा शिकार करू शकाल. नगरवासियांना बरोबर नेण्याची गरज नाही.

काळ्या हरणांचे दोन कळप पकडले गेले होते. एकाचा नेता रोहंत होता तर दुसऱ्या कळपाच्या नेत्याचे नाव होते हरिण. तो देखील सुयोग्य नेता होता. परंतु तो आपल्या दलावर प्रेमाने नाही तर कठोरतेने शासन करीत असे. हरणांचा विहार पाहायला गेला असताना राजाची नजर या दोघांवर पडली. इतकी सुंदर हरिणे त्याने कधीच पाहिली नव्हती. त्यांना कोणत्याही प्रकारची इजा न करण्याचा हुकूम राजाने दिला.

राजा जवळजवळ रोज शिकारीला जाई. त्याला आपल्या अचूक नेमबाजीचा गर्व होता. बाण मारण्यापूर्वी वेगाने दूर जाण्याची संधी तो त्यांना देई. एक हरिण मारल्यावर तो त्या दिवशी शिकार थांबवी. परंतु हा भयावह धनुर्धर बगीच्यात येताच हरणे भीतीने इतस्ततः पळू लागत. राजाने एक हरिण मारून शिकार संपविण्यापूर्वी या पळापळीमुळे अनेक हरणे जखमी होत.



याचा हरणांना फार त्रास होत होता. हे पाहून रोहंत हरिणला म्हणाला, 'मित्रा, आमचे नशीबच वाईट! आमचा कोणी ना कोणी साथीदार रोज मरणार हे निश्चित आहे. प्रत्येक प्राणी कधी ना कधी मृत्युमुखी पडतोच. आपण जंगलात राहात होतो तेव्हाही शिकारी, शेतकरी, जंगली जनावरे यांच्या तावडीतून नेहमी सुटत होतो

असेही नाही. आमच्यापैकी एकाला रोज मरावे लागते पण इतरही जखमी होऊन कष्टी होतात ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे'.

हरिण म्हणाला, आहे तर दुःखाची गोष्ट पण आपण काय करू शकतो? काही उपाय नाही बघ'.

'उपाय आहे तर', रोहंत म्हणाला. रोज आपण एका हरणाचे नाव काढू. ज्याचे नाव येईल त्याने स्वतः राजाची शिकार व्हायला जावे. एके दिवशी माझ्या कळपातून तर दुसऱ्या दिवशी तुझ्या कळपातून नाव काढू. ज्याला मरायचे असेल तो मरेल, निदान कोणी जखमी तर होणार नाही. हरिणला हा उपाय पसंत पडला.

राजाला शिकारीचा फार शोक होता पण त्याला दररोज फक्त एक हरिण हवे होते. इतर हरण विनाकारण जखमी होत असल्यामुळे त्यालाही दुःख होत होते. हरणांची ही विनंती त्याने खुशीने मान्य केली. परंतु शिकारी नसून कसाई असल्याप्रमाणे एका हरणाने स्वतःच रोज त्याच्याकडे येणे त्याला पसंत नव्हते. त्याने आपल्या बगीच्याच्या कुंपणाभोवती काही अंतर ठेवून आणखी एक कुंपण उभारले. नव्या व जुन्या कुंपणां-च्यामध्ये संपूर्ण बगीच्याभोवती जाणारा एक रस्ता ठेवला. या रस्त्यावर त्याने दौड सुरू करण्याचे स्थान निश्चित केले. येथेच आतल्या कुंपणाला एक दार ठेवले. ज्या हरणाची त्या दिवशी पाळी असे ते या दारातून बाहेर पडून रस्त्यावर येई. राजा



घोड्यावर बसून त्याची वाट पाही. हरण बरेच दूर निघून गेल्यावर राजा त्याचा पाठलाग करी व धनुष्य-बाणाने त्याची शिकार करण्याचा प्रयत्न करी.

हरिण नेम चुकवून पूर्ण गोल फिरून त्याच जागेवर परत येऊ शकले तर त्याला जीवदान दिले जावे आणि पुन्हा त्याची पाळी आल्यावरच त्याने शिकार व्हायला जावे हे देखील राजाने मान्य केले. परंतु राजाचा नेम इतका अचूक होता की हरिण मुळी वाचतच नसे. ज्या हरिणावर पाळी येई त्याला आपण पुन्हा सूर्योदय पाहू शकणार नाही याची कल्पना असे. परंतु पूर्वीपेक्षा आता स्थिती बरी होती. पूर्वी राजा येताच भयाने हरणांची पळापळी व्हायची. एक हरिण मरायचा तर सहा घायाळ व्हायचे.

एके दिवशी एका हरिणीची पाळी आली. ती गर्भवती होती. हरिणीने विचार केला, 'मी तर आज मारली गेले तर माझे बछडे जन्मू शकणार नाही. माझ्याबरोबर तेही मारले जाईल. बाळ होईपर्यंत मला सूट मिळाली तर नंतर मरायला माझी काही हरकत राहाणार नाही', ही हरिणी हरिणच्या कळपात होती. आपली पाळी पुढे ढकलण्याची विनंती तिने त्याला केली. हरिण तिचे दुःख जाणत होता. पण तो म्हणाला, 'बाई, हे तुझे दुर्दैव खरे, पण मी काय करू? तुझ्याऐवजी दुसऱ्या कुणाला पाठवता येणार नाही मला. जीव कुणाला प्रिय नसतो? सर्वांची इच्छा जास्तीतजास्त जगायची असते.



तुझ्याऐवजी दुसऱ्याला पाठविणे म्हणजे त्यावर अन्याय केल्यासारखे होईल.' बिचाऱ्या हरिणीला त्याचे म्हणणे उचित वाटले. बरोबर आहे, आपली पाळी येण्यापूर्वी कोण मरेल? आता काही आशा नाही हे तिला कळून चुकले. परंतु तिने शेवटचा प्रयत्न करून पाहिला. सल्ला मिळण्याच्या आशेने दुसऱ्या कळपाचा नेता असलेल्या रोहंताकडे ती गेली. रोहंताने धीराने तिची गोष्ट ऐकून घेतली. तो देखील म्हणाला की, हरिण योग्य तेच बोलला होता. तिच्याऐवजी दुसऱ्या कोणाला पाठविणे अन्यायाचे होईल. परंतु तो हेही म्हणाला की तुझे बाळ जन्माला येत नाही तोपर्यंत तुला जायची गरज नाही.'





'मग आजचा दिवस कसा निभावणार?' तिने विचारले.

'ते मी पाहून घेईन.' रोहंत उत्तरला.

राजा शिकारीला येताच शिकारस्थानी स्वतः रोहंताला पाहून त्याला फार आश्चर्य वाटले.

"मित्रा, तुला व दुसऱ्या कळपाचा नेता हरिण याला इजा न पोचविण्याचा हुकूम मी दिला आहे ना! इतरांबरोबर तुला आपले नाव द्यायला नको होते. मीच माझ्या आदेशाच्या विरुद्ध कसा जाऊ बरे? तू परत जा व दुसरे हरिण पाठवून दे"

रोहंताने राजाला हरिणीची कथा ऐकवली. तो म्हणाला, "राजन, मी किंवा हरिणीने दुसऱ्याला पाठविणे अन्यायाचे झाले असते. परंतु मी तसे करणार नाही. म्हणून तिच्याऐवजी मीच स्वतः प्राण द्यायला आलो आहे."



हे ऐकून राजा इतका प्रभावित झाला की बराच वेळ तर तो काही बोलूच शकला नाही. मग तो म्हणाला, "आज शिकार होणार नाही. मला तुझ्याशी पुन्हा काही बोलायचे आहे. संध्याकाळी मला भेट."

संध्याकाळी रोहंत भेटला तेव्हा राजा म्हणाला, "तुमच्या दोघांचेही प्राण न घेण्याचा निर्णय मी घेतला आहे. तुला किंवा हरिणीला कोणी इजा करणार नाही."

"आपण हा निर्णय का घेतलात ? रोहंताने विचारले.

"का !" राजा उत्तरला, "त्या बिचाऱ्या हरिणीला किंवा तुझ्यासारख्या विशाल हृदयी हरणाला मारले असते तर ती मोठी निर्दयता झाली असती, मोठा अत्याचार झाला असता."

"महाराज" रोहंत म्हणाला, 'आमच्या प्रमाणे आमच्या कळपातील हरणही आपल्या दयेचे अधिकारी नाहीत का ?'

राजाला रोहंताचे शब्द लागले. तो काही वेळ विचार करीत राहिला. मग त्याने एक मोठा निर्णय घेतला. तो म्हणाला, 'आजपासून मी हरणांची शिकार सोडली. आता हा बगीचा म्हणजे हरणांचे क्रीडांगण. स्वच्छंद व निर्भय होऊन त्यांनी यात विचरावे. जंगलात व शेतात देखील कोणी त्यांना मारणार नाही. मात्र शेतांचे नुकसान ते करीत असतील तर गोष्ट वेगळी.'

याप्रमाणे पशु-विहारांचा किंवा 'अभयारण्या'चा प्रारंभ झाला. परंतु कालांतराने पशूंवर प्रेम करण्याच्या या परंपरेचे आपणास विस्मरण झाले. भारतात मानवाच्या क्रौर्याचा त्रास इतर सर्व जनावरांपेक्षा काळ्या हरणांना अधिक सहन करावा लागला. बिचारे शेकड्यांनी मारले गेले.

आमच्या निर्दयतेचा परिणाम काय झाला हे आता आपल्याला कळून येत आहे. आज देशभर काळ्या हरणांची रक्षा करण्यात येत आहे. त्यांना मारण्याची मनाई आहे.



# मर्कटराज
## नंद्रीय

# मर्कटराज नंद्रीय

एकदा मध्यप्रदेशाच्या एका जंगली भागातील बंदरांच्या कळपात बंदराचे एक पिल्लू जन्माला आले. त्याच्या आई-बापांनी त्याचे नाव ठेवले नंदिय.

हळूहळू नंद्रीय मोठा होऊ लागला. तो फार दयाळू होता तसेच मोठा साहसीही होता. त्याला भीती ठाऊक नव्हती. जंगल शोधत तो एकटाच फिरायचा. त्याच्या मातापित्यांनी त्याला समजावले की, मोठा होईपर्यंत कळपातच राहिले पाहिजे. संकट आले तर तो एकटा काय करील? काही दिवस तर तो त्यांचे ऐकायचा परंतु साहसी वृत्ती व नवे अनुभव घेण्याची त्याची इच्छा इतकी तीव्र होती की काही दिवसांनंतर कळपाबरोबर न राहाता एकटाच भटकायला बाहेर पडायचा. परंतु सूर्यास्तापूर्वी कळपात यायचा.





जंगलाच्या मध्यभागी त्याचा कळप राहात होता. असाच एकदा नंद्रीय एका झाडावरून दुसऱ्यावर उड्या मारीत त्यापासून दूर, जंगलाच्या सीमेवर पोचला. जंगल संपताच एक छोटीशी नदी व त्यात असलेले बेट त्याला दिसले. बेटावर आंब्याची झाडे असून त्यावर पक्व फळे लटकलेली आहेत हे पाहून नंद्रीय फार खूश झाला. त्याला बेटावर जायचे होते. परंतु नदी त्याच्यामानाने फार रुंद होती. नदी शुष्क असती तरी त्याच्यासारख्या तगड्या जवान बंदरालाही ती ओलांडायला दोन लांब



उड्या माराव्या लागल्या असत्या. परंतु नुकताच पाऊस पडला होता व तिला पूर आला होता. ती खोल वाटत होती. तिचा प्रवाहही तीव्र होता.

हतोत्साह होऊन कळपात परत जाण्याचा विचार नंदियाच्या मनात येतो न येतो तोच त्याला बेट व नदी किनारा यांच्या मध्ये पाण्यावर कसली तरी काळी वस्तू दिसली. निरखून पाहाता तो एका मोठ्या दगडाचा वरचा भाग आहे हे त्याच्या लक्षात आले. त्या भोवती गिरक्या घेणाऱ्या पाण्यावर दुग्धधवल फेस आला होता. दगडाचा थोडासाच भाग पाण्याबाहेर होता. परंतु नंदीयाला तेवढे पुरेसे होते. एका





उडीत दगडावर व दुसऱ्या उडीत तेथून झाडावर जाण्याचा विचार त्याने केला. यात धोका तर होताच पण नंदिय फार साहसी होता. त्याने बेटावर जाण्याचा निश्चय केला.

बेटावर खूप आंबे होते. इतके गोड व सुगंधी आंबे त्याने आजपर्यंत खाल्ले नव्हते. त्याने इतके आंबे खाल्ले की घरी जायची वेळ झाली तेव्हा हालणेही कठीण झाले. त्याचे पोट डब्ब झाले होते. अचानक वजन दुप्पट झाल्यासारखे त्याला वाटले. उडी मारण्यापूर्वी त्याला एक तास वाट पाहावी लागली. तरीही तो दगडापर्यंत पोचू शकला



नाही. त्याचा कोपराच त्याच्या हाती आला. तो पकडून पाण्यात हातपाय मारत तीव्र प्रवाहापासून नंद्रीय स्वतःला वाचवीत राहिला. मग कसातरी तो दगडावर चढून बसला. विश्रांतीसाठी थोडा वेळ तेथेच थांबला. पाणी खूप थंड होते. नंदिय अगदी भिजून गेला होता. तो मनातल्या मनात म्हणाला, 'चुकलो. आता नाही असा हावरेपणा करणार. भूक असेल तितकेच खाईन.' दुपारच्या उन्हात विश्रांती घेत अंग सुकवल्यावर तो दगडावरून उडी घेऊन किनाऱ्यावर आला व तेथून पळत कळपात गेला



मोठ्या उत्साहाने व ऐटीने नंद्रीयाने आपल्या आईवडिलांना व कळपातील इतर बंदरांना जगातील सर्वांत गोड आंबे असलेल्या बेटाविषयी सांगितले. परंतु मुलांना कल्पनेच्या जगात विहरायची सवय असते. उत्साहाच्या भरात प्रत्येक गोष्टीचे इतके फुगवून वर्णन ते करतात की, मोठे लोक हसून त्यांचे म्हणणे कानाआड करतात. कळपातील बंदरांना वाटले, नंद्रीय थापा तरी मारत आहे किंवा त्यांना बुद्दू बनविण्याचा प्रयत्न करीत आहे. जेव्हा नंदियाने त्यांना बेटावर येण्याचे निमंत्रण दिले तेव्हा ते म्हणाले, 'नाही बाबा, आम्हाला नाही यायचे! तुझे आंबे तुलाच लखलाभ होवोत!!'





आणि नंद्रीयाने केलेही हेच. त्याला या बेटाचा शोध लागला तेव्हा पावसाळा नुकता कोठे सुरू झाला होता. आता तो ऐनभरात होता. पाऊस अगदी कोसळत होता. नदीत पाणी वाढले असून पाण्यावर अरालेला दगडाचा भाग कमी कमी होत असल्याचे त्याला दिसले. आता दगडावर अतिशय काळजीपूर्वक लक्ष ठेवायला हवे हे त्याच्या ध्यानात आले. तो पूर्ण पाण्याखाली गेल्यावर त्याला बेटावर जाता येणार नव्हते. पूर ओसरून दगड पुन्हा पाण्याबाहेर यावयास बहुधा अनेक दिवस लागले असते.




नदीत काही अंतरावर एक दैत्यासारखा भरभक्कम मगर राहात होता. उडी मारून बेटावर येणाऱ्या व पुन्हा घरी परत जाणाऱ्या नंदियाला तो रोज सकाळी आपल्या जागेवरून पाहायचा. त्या लोभी मगराला बंदराचे मांस फार आवडायचे. या ना त्या उपायाने नंद्रीयाच्या मांसावर ताव मारण्याचा निश्चय त्याने मनोमन केला. नंद्रीयाने मगर पाहिला नव्हता. आपल्याला पाहिले तर भिऊन तो पुन्हा कदाचित परत येणार नाही म्हणून मगर बाहेर निघत नव्हता.



नदीतील पाणी वाढत राहिले. एके दिवशी नंद्रीय पाहातो तो गरगरणाऱ्या फेनील पाण्यातून दगडाचा थोडासा भागच काय तो दिसत होता. अशा स्थितीत उडी मारण्याचा प्रयत्न करणे धोक्याचे होते. काय करावे याचा विचार तो करू लागला. त्याने इतक्यावेळा दगडावर उडी घेतली होती की त्या थोड्याशा भागावर नेमकी उडी घेऊन बेटावर जाऊ शकू याची त्याला खात्री होती. बेटावर जायचा हा शेवटचा दिवस हे त्याला उमगले होते. पावसाळा संपून पूर ओसरेपर्यंत तो पुन्हा तेथे जाऊ शकणार नव्हता.

आता पुन्हा लवकर बेटावर येता येणार नाही या विचाराने त्याने नेहमीपेक्षा जास्त वेळ तेथे घालविला. उशीर झालेला पाहून तो घाईघाईने उडी मारायच्या जागी येऊन पोचला. सूर्य उतरून झाडामागे गेला होता. नेहमी तो परतायचा तेव्हा नदी उन्हात चमकत असायची. आज तिच्यावर संध्याछाया पसरली होती.



नंद्रीय उडी घेता घेता थबकला. आज दगड नेहमीसारखा दिसत नव्हता. थोड्या वेळा पूर्वी तर त्याचा थोडासाच भाग पाण्यावर दिसत होता आता तो अचानक वाढून पावसाळ्यापूर्वी होता तेवढा झाला होता. हे कसे झाले?



नंद्रीयाला वाटले काही गडबड आहे. दुरून छायेत तो दगडच भासत होता, पण पूर इतक्या लवकर कसा ओसरला: बेटाच्या ज्या काठावरून तो उडी मारत असे तेथे त्याने पाण्याची पातळी पाहिली. पाणी कमी झाले नव्हते. मग तेथेच ते कसे ओसरले? नदीत राहाणारा एखादा दैत्य त्याला फसविण्याचा प्रयत्न करीत असल्याची त्याची खात्री झाली. त्याने एक युक्ती केली.





दगडाशी संभाषण करीत असल्यासारखा ओरडून तो म्हणाला, 'मित्रा, मी परत आलो आहे' अर्थात दगड काहीच बोलला नाही. दुःखी स्वरात तो पुन्हा म्हणाला, 'प्रिय दगडा, आज माझ्याशी अबोला का?'

मगराला वाटले दगड बंदराशी बोलत असला पाहिजे. आज त्याच्यातर्फे आपणच उत्तर द्यावे झालं. तो ओरडून म्हणाला, 'मित्रा क्षमा कर, मला जरा डुलकी लागली होती. तुझी हाक ऐकूच आली नाही मला!'



तो दगड नसून मला मोठा मगर आहे हे नंद्रीयाला कळून चुंकले. त्याचे लांब डोळे व शरीराचा थोडा भागच काय तो वर होता. बाकी सर्व भाग पाण्याआड.

तो जोराने म्हणाला, 'तू माझा मित्र नाहीस. तू आहेस मगर. तुला पाहिजे तरी काय ?

बंदराने चातुर्याने आपल्याला ओळखले याचा मगराला फार संताप आला. तो रागाने म्हणाला, 'तुला खायचे आहे मला.'

परतायला दुसरा मार्ग नव्हता. मगराला गुंगारा देऊनच प्राण वाचवता आला असता. तो म्हणाला, 'गड्या, दुसरा उपाय नसल्यामुळे मी हार मानतो. मी स्वतः तुझ्या हवाली व्हायला राजी आहे. मी आता उडी घेतो. मला पकडायला तू आपला





जबडा उघड. डोळे बंद ठेव हं! नाहीतर तोंडात पडायच्या ऐवजी डोळ्यावर पडलो तर तुझे डोळे फुटतील.'

मूर्ख मगराने डोळे घट्ट बंद केले व तोंड पूर्ण उघडले. नंद्रीय पहिल्याने थोडा घाबरला पण मग हिंमत बांधून मगराच्या खुल्या तोंडापासून शक्यतो दूर त्याच्या पाठीवर उडी घेतली. मगराची पाठ दगडासारखी टणक होती. त्याचा फायदा घेऊन नंदियाने त्यावरून उडी घेतली. जणू उडतच तो नदीकिनाऱ्यावर येऊन पोचला व झटपट एका झाडावर चढला. झाडावरून मगराला चिडवत तो म्हणाला, 'गड्या, तुझे भक्ष्य व्हायची आज माझी इच्छा नव्हती. बुद्दूमिया, बसा आपली शेपटी चघळत!'







कितीतरी ऋतू आले व गेले. कळ्पाचा वृद्ध नेता मृत्यू पावला. नंद्रीय बुद्धिमान व साहसी असल्यामुळे कळ्पातील सर्व बंदर त्याला मानत होते. त्याला नेता म्हणून निवडण्यात आले.

बंदरांचा कळ्प राहात होता तेथे पुरेशी फळझाडे नव्हती. म्हणून आम्र-वृक्षांच्या बेटांवर वसण्याचा विचार सर्वांनी केला. बेट खरोखरच नंद्रीय म्हणतो इतके चांगले आहे यावर वृद्ध बंदरांचा विश्वास नव्हता. परंतु तरुणात उत्साह संचरला. कारण नव्या जागी जाणे त्यांना आवडत होते.

बंदराच्या कळ्पाने बेटावर जाण्याचा निर्णय घेतला तेव्हा पावसाळा संपला होता. याचा फायदा त्यांना मिळाला. कारण नदी जवळ जवळ शुष्क झाली होती आणि कितीतरी दगड पाण्यावर आले होते. पिल्लं देखील एका दगडावरून दुसऱ्यावर उड्या घेत सहज नदी ओलांडू शकत होती. बेटावर पोचल्यावर ज्यांच्या मनात शंका होती अशा बंदरांनी देखील जागा उत्तम असल्याचे मान्य केले.



परंतु संकट त्यांच्या डोक्यावर घिरट्या घालीत होते.

उन्हाळा आला तशी गरमी वाढू लागली. तहानेने गळा सुकू लागला. बंदर पाणी प्यायला वारंवार नदीवर जाऊ लागले. परंतु नदी देखील आटत चालली होती. वाहत्या प्रवाहाऐवजी जागोजागी छोटी छोटी तळी बनली होती. यातील पाणीही सुकून चिखलांनी भरलेली डबकी काय ती राहिली. गरमी वाढली तशी तीही सुकू लागली. जुन्या जागी पाणी मुळीच राहिले नाही तेव्हा बंदरांचे कळप किनाऱ्यावर





फिरत पुढे कुठे पाणी आहे की नाही याचा शोध करू लागले. नदीला एक वळण होते. तेथे नदीचा तळ खूप खोल होता व जवळच एका ठिकाणी मोठा जलसंचय होता. ज्या बंदरांनी तो शोधून काढला होता त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. पण त्यांनी तिकडे धाव घेताच एक बंदर ओरडले 'थांबा!' इतरांनी कारण विचारतां त्याने निमुटपणे तळ्याच्या काठावरील नरम ओल्या जमिनीकडे बोट दाखविले. ससे व खारींच्या पायांच्या खुणा तळ्याकडे जाणाऱ्या पावलांच्याच होत्या, परतीच्या पाउल खुणा नव्हत्या. काहीतरी घोटाळा दिसत होता. ही गोष्ट ताबडतोब आपल्या सरदाराला सांगायचे त्यांनी ठरविले.



तेथे येऊन नंद्रीयाने त्या खुणा लक्षपूर्वक पाहिल्या. तळ्याची पण पाहणी केली. तळ्याच्या किनाऱ्यावर सरकांड्या उगवल्या होत्या त्या छोट्या बांबूसारख्या दिसत होत्या. नंदियाने बारकाईने पाहिले तेव्हा त्याला त्याचा जुनाच शत्रू असलेल्या मगराचे डोके व नाकाड दिसले. तो सरकाड्यांमध्ये दडून बसला होता.



आपल्याला नंद्रीयाने पाहिल्याचे मगराला कळून चुकले. आता लपून राहाण्यात फायदा नाही हे पाहून तो ओरडून म्हणाला, 'तुम्ही सर्व असे न तसे मरालच. पाणी प्यायला येणाऱ्या सर्व जनावरांना मी खाऊन टाकीन. पाणी न प्याल तर तहानेने मराल. पावसाळ्याला अजून दोन महिने आहेत. आणि माझ्या तळ्याशिवाय कोठेच पाणी नाही.'


पुष्कळ वेळ नंद्रीयाला काय करावे सुचेना. दरम्यान बंदर विशेषतः त्यांची पिल्लं तहानेने मरणोन्मुख झाली होती. अचानक नंद्रीयाला चांगला उपाय सुचला. तो बंदरांना म्हणाला, 'मगरापासून दूर नदीच्या किनाऱ्याने पसरा.' मग त्याने काही सरकांड्या उपटल्या एकाचे नरम टोक दाताने तोडून फुंकर मारली. परंतु टोकाखाली एक गाठ होती. त्याने आणखी एक सरकांडी उपटली पण त्याच्या खालच्या बाजूला



गाठ होती. त्याने गाठीच्या वरपर्यंतचा भाग तोडून टाकला मग फुंकर मारली. आता नळीत काही अडथळा नव्हता. हवा आरपार निघून गेली. मगर शिकार साधण्यासाठी बसला होता तेथून नंद्रीय मागे सरकला. मग दुरून नळीचे एक टोक पाण्यात घालून दुसरीकडून तो पाणी पिऊ लागला. पाणी नळीतून वर चढून त्याचा सुकला गळा आर्द्र करू लागले. त्याने दुसऱ्या बंदरांना हाक मारून याच युक्तीने पाणी पिण्यास सांगितले.

काही वात्रट बंदर कसे बनवले लेकाला ! या आविर्भावात मगराकडे पाहून तोंड विचकू लागले. मगराने त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला. पण तो अवजड होता. लवकर हालू शकत नव्हता. तो पोचेपर्यंत बंदर पाणी पिऊन झाडावर पळून जात. एकदोनदा त्याने सरकांड्यांवर प्रहार केला, ते ओढले. पण बंदर चपळाईने सरकून दुसरीकडे गेले आणि नव्या नळीने पाणी पिऊ लागले. मूर्ख मगर बंदरांचा पाठलाग करीत पाण्यात फिरू लागला. पण लवकरच थकून लाकडाच्या ओंडक्यासारखा पडला व बंदरांकडे रागाने पाहू लागला.

दोन महिन्यांनी पावसाळा आला. आता बंदरांना तळ्यावर जाण्याची गरज उरली नाही. नदी भरली होती. किनाऱ्यावरूनसुद्धा ते पाणी पिऊ शकत होते.





आंब्यांची बहुतेक झाडे तटापासून दूर, बेटाच्या मध्यभागी होती. परंतु एक झाड बेटाच्या किनाऱ्यावर प्रवाहालगत, दगडाच्या विरुद्ध दिशेला दुसऱ्या तटाच्या समोर होते. त्याची एक फांदी इतकी लांब होती की, ती जवळजवळ नदीच्या दुसऱ्या तीराला स्पर्श करीत होती. पण ती सुकलेली होती. तिच्यावर पाने, फळे नव्हती. तिच्या खालच्या अंगाला एक नवी डहाळी फुटली होती. तीवर मात्र खूप पाने होती. बहर आला की संपूर्ण डहाळी फुलून जायची.

नंदीयाला वाटले या फांदीला फळे लागली तर संपूर्ण कळप धोक्यात येईल. काही पिकली फळे प्रवाहाबरोबर वाहात जाऊ शकतात. ही छोटी नदी पुढे जिच्या काठावर वसली आहे अशा एखाद्या मोठ्या नदीला मिळत असणार. ही फळे प्रवाहातून माणसाच्या हाती लागली तर ती कुठून आली याचा शोध ते घेतील व पत्ता लावत लावत ते बेटावर येतील व नक्कीच बंदरांना हाकून लावतील.

म्हणून त्याने बंदरांना हुकूम दिला की त्या झाडावरचे आंबे दिसताच गट्ट करून टाकत जा. बंदरांनी त्याच्या हुकमाचे पुरेपूर पालन केले.





परंतु फांदीच्या टोकावर मधमाश्यांचे पोळे होते. त्याच्या आड एक आंबा लागला व पिकू लागला. मधमाश्यांच्या भीतीने बंदरांना तेथे जाण्याची हिंमत झाली नाही. काठावरून तो आंबा दिसत नव्हता.

एके दिवशी आंबा पिकून पाण्यात पडला व प्रवाहाबरोबर सरकत नदीत गेला. वाहत वाहत राजाचा स्नान करण्याचा घाट होता तेथपर्यंत पोचला. राजाचा महाल त्याच नदीकाठी होता. फळ अजून ताजे होते. राजाने ते खाल्ले. आजपर्यंत त्याने असा मधुर व सुगंधित आंबा खाल्ला नव्हता.

हा स्वादिष्ट आंबा कोठून आला याचा शोध लावल्याशिवाय शांत न बसण्याचा निश्चय त्याने केला. आपल्या धनुर्धरांना सोबत घेऊन राजा नावेत बसून निघाला.



जाता जाता मोठ्या नदीला जेथे नदी मिळत होती तेथे ते येऊन पोचले. किनाऱ्यावर उतरून शोध घेण्याचे त्यांनी ठरविले. शोधता शोधता ते आम्र वृक्षांच्या बेटावर येऊन पोचले.

राजा पाहातो तो बेट बंदरांनी भरलेले. त्याच वेळी तो त्यांना हाकून देऊ इच्छित होता. पण अंधार पडत चालला होता. तो आपल्या धनुर्धरांना म्हणाला, 'ज्यांना खूप फळे लागली अशा झाडांचे रक्षण करा. रात्री बंदरांना फळे खाऊ देऊ नका. उद्या सकाळ होताच बाणांच्या वर्षावाने त्यांना घाबरवून हाकून देऊ.'

एक छोटा बंदर झाडाआड दडून राजाचे बोलणे ऐकत होता. तो एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उड्या मारीत बेटाच्या दुसऱ्या किनाऱ्यावर जेथे नंदिय रात्री आराम करीत असे तेथे येऊन पोचला. त्याने नंद्रीयाला सर्व काही सांगितले. घाबरून त्याने विचारले, 'आता काय करायचे? उद्या तर आपण सर्व बाणांनी जखमी होऊन मृत्युमुखी पडू.'

नंद्रीय बराच वेळ विचार करीत राहिला. मग तो म्हणाला, 'बचावण्याचा एकच मार्ग आहे. जा, एका तासाच्या आत सुकल्या फांदीच्या झाडाजवळच्या किनाऱ्यावर जमण्यास सगळ्यांना सांग.'





पाऊस जोरात होता. नदीला पूर आला होता. ज्या दगडावर बंदर नदीतटावरून उडी मारीत होते तो कित्येक हात पाण्यात बुडला होता. त्या मार्गाने पळून जाणे अशक्य होते. म्हणून नंद्रीय त्याच्या विरुद्ध दिशेला गेला. तेथील एकाकी झाडावर तो चढला आणि नदीच्या दुसऱ्या तटापर्यंत गेलेल्या शुष्क फांदीवरून पुढे सरकू लागला. टोकावर जाऊन त्याने अंतराचा अंदाज घेतला. तेथून उडी मारली तर किनाऱ्यावर पोचता येईल की नाही? त्याला वाटले पोचता येईल. उडी मारून नदीच्या दुसऱ्या तटावरील झाडावर तो गेला. उडीत त्याने जे अंतर तोडले होते त्यांचा अंदाज घेतला. मग त्याने एक पातळ परंतु मजबूत बांबू उपटला. त्याची लांबी जवळजवळ त्याने ओलांडलेल्या अंतरायेवढी होती.



बांबू घेऊन तो झाडावर चढला. त्याचे एक टोक नदीकडे जाणाऱ्या एका फांदीला मजबूतीने बांधले. मग हलके हलके तो बांबूवर चढला. तसे करणे फार कठीण होते कारण बांबू पातळ व निसरडा होता. परंतु यत्नपूर्वक तो बांबूच्या दुसऱ्या टोकाला जाऊन पोचला. ते टोक त्याने आपल्या कंबरेला बांधले मग तो बांबूचे टोक मागे पुढे हालवू लागला. बांबू नदीवर जोराने झुलू लागला. झुलता झुलता ज्या किनाऱ्यावर सुकलेली डहाळी होती तेथे तो आला. तेथे येताच नंद्रीयाने चटकन सुकी डहाळी पकडली.

कमरेला बांधलेले बांबूचे टोक सोडवून ते शुष्क फांदीला बांधले की नदीवर पातळ व नाजूक बांबूचा पूल तयार होईल, ही होती त्याची युक्ती! पूल नाजूक झाला असता पण धोक्याचा नाही. परंतु पाहातो तो बांबूची लांबी आणि दोन ठिकाणांमधील अंतर याविषयीचा त्याचा अंदाज चुकीचा होता. बांबू दोन हात कमी पडत होता.



हे अंतर त्याच्या शरीराच्या लांबीने भरून काढता येत होते. कमरेपासून डोक्यापर्यंतची त्याची लांबी उरलेली जागा व्यापू शकत होती. पण बांबू कसा सोडवायचा? दाताने कापून सोडवला तर तो सुटून एकदम मागे जाईल. काय करावे याचा विचार त्याला पडला. पुन्हा हा सर्व प्रयोग करून पाहायचा? नंद्रीय या विचारात असता अचानक बेटावरून आरडाओरडा ऐकू आला. राजाच्या धनुर्धरांनी सूर्योदयाची वाट न पाहाताच बाणांचा वर्षाव सुरू केला होता. विचार करायला वेळ नव्हता. बांबूने बांधलेल्या आपल्या शरीरालाच पुलाचा उरला भाग बनवून बंदरांचा प्राण वाचविण्याचा निश्चय त्याने केला.

त्याने हलक्या आवाजात बदरांना बोलाविले. नंद्रीयाने बनविलेल्या पुलावरून नदीपलीकडे जाण्यास सर्व बंदर खाली एकत्र जमले. बंदरांची संख्या मोठी होती. एक



एक करून ते नंद्रीयाच्या शरीरावर चढुन बांबूचा पूल ओलांडू लागले. काही वेळा-नंतर नंद्रीयाची शक्ती खचू लागली. आता तो तरुण राहिला नव्हता. अचानक नंदियाच्या छातीत जोराची कळ आली. त्याला वाटले आता कोणी त्याच्या शरीरा-वर पाय ठेवला तर तो मरून जाईल. परंतु अजून एक बंदरीण राहिली होती. तिची दोन पिल्लं भिऊन तिच्या पोटाला बिलगली होती. नंद्रीयाने वेदना दाबायचा प्रयत्न केला. आपल्या त्रासाची जराही कल्पना त्याने कोणाला येऊ दिली नाही. दात दाबून जल्दी करण्याचा इशारा त्याने केला.

ती दुसऱ्या तीरावरील झाडावर पोचताच इकडे सर्वनाश झाला. बांबू व फांदी यांना बांधून ठेवणारी दुसऱ्या बाजूची गाठ हळूहळू सैल होत होती. बांबूवर चढून पलीकडे जाणाऱ्या बंदरांचे वजन त्याला पेलवले नाही. गाठ काचून तुटून गेली. त्याचा अचानक झटका बसल्यामुळे नंदियाची पकड सुटून तो जमिनीवर पडला. आधीच तो अर्धमेला झाला होता.

राजा चूपचाप उभा राहून बराच वेळापासून हे सर्व पाहात होता. मंद चंद्र-प्रकाशात स्पष्ट दिसत नव्हते पण बंदर बेट सोडून चालल्याचे त्याने पाहिले. त्याला हेच तर हवे होते. म्हणून तो खुशीत येऊन हे पाहात होता. परंतु कंबरेला बांधलेल्या बांबूसकट नंद्रीय खाली कोसळला तेव्हा पहिल्यांदा काय झाले ते त्याच्या लक्षात आले. तो धावत नंदियाजवळ आला व मोठ्या प्रेमाने त्याची शुश्रूषा करू लागला.

नंद्रीयाची स्थिती वाईट असून तो आता मरणार हे पाहाताच राजाच्या डोळयांत पाणी आले. तो म्हणाला, याप्रमाणे दुसऱ्याकरता आपल्या प्राणांचे बलिदान करणारा कोणी मनुष्य देखील मी पाहिला नाही किंवा असे काही ऐकलेही नाही. तुझी काही अंतिम इच्छा असेल तर मला सांग. माझ्या शक्तिबाहेर नसले तर ती मी अवश्य पूर्ण करीन.

अत्यंत क्षीण स्वरांत नंद्रीय म्हणाला, 'माझे माझ्या कळपावर फार प्रेम आहे. त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, बस!' मोठ्या कष्टाने येवढे बोलला आणि मरून पडला.

